


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ०३३ ● पुणे ● गुरुवार, दि. १२ डिसेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



आंतरशालेय, महाविद्यालयीन... 3



2024 'ग्लोबल एंटरटेनर ऑफ द ईयर'... 4

## ठळक बातम्या

### कैदी पसार

**पुणे : (आरंभ पर्व)** येरवड्यातील खुल्या कारागृहातून जन्मठेपेची शिक्षा सुनावलेला कैदी पसार झाल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी पसार झालेल्या कैद्याविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल मेघदास पटोनिया (वय 35) असे पसार झालेल्या कैद्याचे नाव आहे. पटोनिया मूळचा ठाणे जिल्ह्यातील टिटवाळा परिसरात असलेल्या म्हारळ गावातील आहे. त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात त्याला जन्मठेपेची शिक्षा, तसेच 15 हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती.

### दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पुणे : (आरंभ पर्व)** पीएमपी बसच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना नगर रस्त्यावरील टाटा गार्डन चौकात घडली. याप्रकरणी पीएमपी चालकाविरुद्ध चंदननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अशोक देवबहाद्दुर घर्ती (वय 32, रा. आनंद पार्क, गणेशनगर, वडगाव शेरी) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याप्रकरणी पीएमपी चालक रवींद्र गेनबा गायकवाड (वय 40, रा. श्री स्वामी समर्थ हाइट्स, आंबेगाव पठार, धनकवडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अशोक घर्ती यांचा भाऊ गोपाल (वय 33) यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार अशोक घर्ती बुधवारी सकाळी सहाच्या सुमारास नगर रस्त्यावरून निघाला होता. चंदनगर भागातील टाटा गार्डन चौकात भरधाव पीएमपी बसने दुचाकीस्वार घर्ती यांना धडक दिली.

# मसाज पार्लरच्या नावाखाली गैरप्रकारांवर कारवाईचा बडगा

## वर्षभरात पोलिसांकडून ३३ गुन्हे दाखल



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मसाज पार्लरच्या नावाखाली गैरप्रकार सुरु असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे करण्यात आल्यानंतर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. वर्षभरात पोलिसांनी मसाज पार्लरच्या नावाखाली सुरु असलेल्या वेश्याव्यवसायावर कारवाई करून 33 गुन्हे दाखल केले. तर मसाज पार्लरवर कारवाई करून गुन्हे शाखेने 20 गुन्हे दाखल केले. तसेच शहरातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांकडून 12 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मसाज पार्लरच्या नावाखाली गैरप्रकार सुरु असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे करण्यात आल्या आहेत. शहर तसेच उपनगरांत 400 हून जास्त मसाज पार्लर आहेत. त्यातील काही मसाज पार्लर वगळता बहुतांश ठिकाणी गैरप्रकार सुरु असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मसाज पार्लरची संख्या विचारात घेतल्यास पोलिसांच्या कारवाईचे प्रमाण कमी आहे. मसाज सेंटरमधील गैरप्रकारांबाबत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे तक्रारी करण्यात आल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकांनी बाणेर, कोढवा, विश्रांतवाडी परिसरातील मसाज पार्लरवर छापे टाकून कारवाई केली. मसाज पार्लर चालकांविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यान्वये (प्रीव्हेन्शन ऑफ इमॉरल ट्रॅफिकिंग ॲक्ट- पिटा) गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवाईत ताब्यात घेण्यात आलेल्या तरुणींची निरीक्षणगृहात रवानगी करण्यात आली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील बेकायदा धंदे, तसेच मसाज पार्लरच्या नावाखाली सुरु असलेल्या गैरप्रकारांवर कारवाईचे आदेश शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना नुकतेच दिले. गैरप्रकारांवर कारवाई न केल्यास खातेअंतर्गत कारवाईचा इशारा पोलीस आयुक्तांनी दिला आहे.

### परदेशी तरुणी मसाज पार्लरमध्ये

गेल्या काही वर्षांपासून शहरात 'थाई स्पा'नावाने मसाज पार्लर सुरू झाले आहेत. या मसाज पार्लरमध्ये काम करणाऱ्या तरुणी मूळच्या थायलंडमधील आहेत. थायलंडमधील तरुणी पर्यटन व्हिसा मिळवून भारतात येतात. पर्यटन व्हिसा मिळवणाऱ्यांना नोकरीची परवानगी मिळत नाही. मात्र, बऱ्याच पार्लरमध्ये थायलंडमधील तरुणी नोकरी करतात. भारतात प्रवेश केल्यानंतर वास्तव्याचा पत्ता दिला जातो. मात्र, बऱ्याच प्रकरणात तरुणी दुसऱ्या पत्त्यावर वास्तव्यास असल्याचे दिसून आले आहे, अशी माहिती पुणे पोलिसांच्या परकीय नागरिक नोंदणी (एफआरओ) विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. परकीय नागरिक नोंदणी विभागाकडून व्हिसा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई केली जाते. त्यांना देश सोडून जाण्याबाबत नोटीस (लिव्ह इंडिया) बजावली जाते. त्यानंतरही त्या देशाबाहेर गेल्या नाही, तर त्यांची हकालपट्टी (डिपोर्ट) केली जाते.

# पडळकरांच्या टीकेला विरोध करायला हवा होता

## युतीतील राष्ट्रवादीकडून युगेंद्र पवारांची अपेक्षा



**पुणे / बारामती :(दै. आरंभ पर्व)**

'भारतीय जनता पक्षाचे नेते गोपीचंद पडळकर यांनी शरद पवार यांच्यावर टीका केल्यानंतर महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादीने त्याला विरोध करायला हवा होता,' अशा शब्दांत राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी अजित पवार यांच्यावर नाव न घेता टीका केली.

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी येथे महायुतीच्या सभेवेळी पडळकर यांनी शरद पवार यांचा ऐकेरी उल्लेख करतानाच त्यांच्यावर कडवट टीका केली होती. या पार्श्वभूमीवर युगेंद्र पवार यांनी बारामती येथे पत्रकारांशी संवाद साधला.

'विधानसभा निवडणुकीत बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण, राजेश टोपे यांसारख्या चांगले काम करणाऱ्या नेत्यांना पराभूत व्हावे लागले होते. मात्र, विधानसभा निवडणुकीत विजय मिळविणारे पडळकर अशी विधाने करीत असतील, तर त्यांच्याकडून जनतेने काय अपेक्षा ठेवायची,' अशी विचारणा युगेंद्र यांनी केली.

'शरद पवार देशातील मोठे नेते आहेत. त्यांच्याबाबत सर्वांना आदर असून त्यांच्यासंदर्भात अशी विधाने करणे योग्य नाही. ही महाराष्ट्राची संस्कृती नाही आणि राज्यातील जनतेलाही ते आवडणार नाही. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्ष महायुतीत असून, महायुतीकडे राज्यातील सत्ता आहे. त्यामुळे महायुतीतील घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादीने त्याबाबत त्यांची भूमिका मांडणे योग्य ठरले असते. या प्रकारच्या विधानांना विरोध करता आला असता,' असे युगेंद्र पवार यांनी स्पष्ट केले. 'आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ताकदीने लढवाव्या लागतील. कार्यकर्त्यांना ताकद द्यावी लागेल. पक्ष संघटना वाढवून ती मजबूत करावी लागणार असून, पक्षामध्ये स्वच्छ प्रतिमेच्या युवकांना संधी द्यावी लागेल,' असे मतही त्यांनी व्यक्त केले.




# रिंग रोडसाठी 200 हेक्टर भूसंपादन बाकी

## ५०० कोटींच्या निधीची रस्ते विकास महामंडळाकडे मागणी



रिंग रोडसाठीचे भूसंपादन अंतिम टप्प्यात आले आहे. सुमारे २०० हेक्टर क्षेत्र संपादन तातडीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यासाठी सुमारे पाचशे कोटी रुपयांची मागणी रस्ते विकास महामंडळाकडे करण्यात आली आहे.

– डॉ. सुहास दिवसे, जिल्हाधिकारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या पुण्याच्या वर्तुळाकार मार्गासाठी (रिंग रोड) पूर्व आणि पश्चिम भागातील 200 हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन बाकी असून, त्यासाठी 500 कोटी रुपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे केली आहे. दरम्यान, येत्या रविवारपर्यंत (15 डिसेंबर) जमीनमालकांनी संमतीने जागा दिल्यास त्यांना 25 टक्के मोबदला दिला जाणार असून, त्यानंतर सक्तीने भूसंपादन केले जाणार आहे.

पुणे रिंग रोडच्या प्रलंबित भूसंपादनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी बुधवारी बैठक घेतली. त्यावेळी भूसंपादन समवन्वयक कल्याण पांढरे तसेच विविध ठिकाणचे भूसंपादन अधिकारी उपस्थित होते. रिंग रोडसाठी सुमारे 90 टक्के भूसंपादन पूर्ण झाल्याचा दावा जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आला.

रिंग रोडसाठी 1 हजार 740 हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. त्यापैकी पूर्व भागात 47 गावांमधून 858.96 हेक्टर, तर पश्चिम भागातील 36 गावांतील 644.11 हेक्टर क्षेत्र संपादन करण्याचे उद्दिष्ट होते. सुमारे 1 हजार 300 हेक्टर क्षेत्र संपादित झाले आहे. पूर्व भागातील 143 आणि पश्चिम भागातील 63 हेक्टर म्हणजेच एकूण 206 हेक्टर क्षेत्राचे संपादन अद्यापही बाकी आहे. भूसंपादन झालेल्या क्षेत्राचे निवाडे करण्याची प्रक्रियाही जिल्हा प्रशासनाकडून हाती घेण्यात आल्याची माहिती भूसंपादन समन्वयक कल्याण पांढरे यांनी दिली.

पूर्व भागातील पुरंदर, भोर, हवेली, मुळशी आणि मावळ तालुक्यातील तसेच पश्चिम भागातील खेड आणि मावळ या दोन तालुक्यांतील काही क्षेत्राचे संपादन करणे बाकी आहे. त्यासंदर्भात येत्या 15 डिसेंबरपर्यंत होणारे भूसंपादन संमतीने झाल्यास 25 टक्के मोबदला दिला जाणार आहे. त्यानंतर होणारे भूसंपादन हे सक्तीने करण्यात येणार आहे. त्यामुळे सक्तीच्या भूसंपादनात चारपटीने मोबादला देण्यात येणार आहे. त्यासंदर्भात तालुका भूसंपादन अधिकाऱ्यांना तशी स्पष्ट सूचना बैठकीत करण्यात आली.

सध्या काही भूसंपादन अधिकाऱ्यांकडे निवाड्याच्या रकमेपैकी काही रक्कम शिल्लक आहे. मात्र, उर्वरित 206 हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाला निधीची गरज आहे. त्याकरिता राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सुमारे 500 कोटी रुपयांची मागणी जिल्हा प्रशासनाने केली आहे. संबंधित भूसंपादन अधिकाऱ्यांकडे रक्कम जमा करावी, अशी सूचनाही जिल्हा प्रशासनाने या बैठकीत रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे.





# शरद पवार आणि मारकडवाडी

शरद पवार, ज्यांची राजकीय कारकीर्द सहा दशकांहून अधिक आहे, त्यांनी वेगवेगळ्या पक्षांना झालेल्या मतदानाची आकडेवारी आणि त्यांनी जिंकलेल्या जागांचा हवाला देत चुकीच्या माहितीकडे लक्ष वेधले. त्यांनी पक्षांना मिळालेली मते आणि जिंकलेल्या जागांची तुलना ‘आश्चर्यजनक’ असल्याचे म्हटले होते. त्यांच्या मते, त्यांचा पक्ष आणि मित्रपक्ष काँग्रेसने राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्यापेक्षा जास्त मते मिळूनही कमी जागा जिंकल्या. “काँग्रेसला 80 लाख मते मिळाली पण त्यांचे 15 उमेदवार आमदार म्हणून निवडून आले. शिंदे यांच्या शिवसेनेला 79 लाख मते मिळाली, त्यांचे 57 आमदार आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 72 लाख मते मिळाली आणि त्यांचे 10 आमदार निवडून आले आहेत. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 58 लाख मते मिळाली आणि त्यांचे 41 उमेदवार आमदार झाले. मतदानाची ही आकडेवारी आश्चर्यकारक आहे. त्यांचा अजून खोलवर अभ्यास करायचा आहे. जोपर्यंत आम्हाला अधिकृत आकडेवारी मिळत नाही तोपर्यंत आम्ही ईव्हीएमबाबत शंका व्यक्त करणार नाही, असे पवार म्हणाले.

शरद पवार यांच्या या टीकेला प्रत्युत्तर देताना, फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले की 2024 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने अधिक मते मिळविली परंतु राज्यात केवळ 9 जागा जिंकल्या. त्यांनी विरोधी पक्षांना ‘पराजय स्वीकारा’ आणि त्याची कारणे काय आहेत याबाबत ‘आत्मपरीक्षण’ करण्यास सांगितले.

निवडणूक निकालातील महत्त्वाचे घटक

पक्षांच्या मतांमध्ये होणारी वाढ हा पक्ष किती विधानसभा मतदारसंघ लढवतो याच्याशीही जोडला जातो. उदाहरणार्थ, शरद पवार यांनी काँग्रेस आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील तुलनेमध्ये निदर्शनास आणल्याप्रमाणे, काँग्रेसने 101 जागा लढवल्या, तर शिवसेनेने 81 जागा लढवल्या. साहजिकच जास्त जागा लढवल्यास जास्त मते मिळण्याची शक्यता वाढते. दुसरे उदाहरण म्हणजे शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची तुलना. विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या गटाने 87, तर अजित पवार यांच्या गटाने 59 जागा लढवल्या होत्या.

जर एखाद्या पक्षाची मते अनेक मतदारसंघात विखुरलेली असतील, तर त्याला एकूण मतांची संख्या जास्त मिळू शकते परंतु तरीही कमी जागा जिंकता येतात. दुसरीकडे, विशिष्ट भागात भक्कम पाठिंबा असलेल्या पक्षाला एकंदरीत कमी मते मिळूनही अधिक जागा जिंकण्याची शक्यता असते. असे घडते कारण एक जागा जिंकणे हे त्या मतदारसंघातील सर्वाधिक मते मिळण्यावर अवलंबून असते, संपूर्ण राज्यात नाही. शरद पवारांचा भारतीय निवडणूक आयोग , मतदान यंत्र , निवडणूक प्रक्रिया, भारताच्या लोकशाही प्रक्रियेची कायदेशीर चौकट इत्यादींबद्दल गैरसमज निर्माण करण्याचा पहिला प्रयत्न नव्हता .

विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत मारकडवाडी गावाने सातत्याने वेगवेगळ्या पद्धतीने मतदान केले आहे, याची नोंद घेतली पाहिजे. भाजपचे महाराष्ट्र अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीदेखील ही माहिती दिली. बावनकुळे यांनी 2014, 2019 आणि 2024 च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचे तपशील सांगून हे गाव कोणत्याही एका पक्षाचा बालेकिल्ला नाही असे म्हटले आहे.

आणखी एका प्रयत्नात, त्यांनी मारकडवाडीतील वादग्रस्त आणि बेकायदेशीर मॉक पोलचे समर्थन करून, ईव्हीएमबद्दल चुकीची माहिती प्रसारित करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. पवारांनी या मॉक पोलला कायदेशीर आधार नसतानाही निवडणुकीच्या प्रश्नांना तोंड देण्याचा एक कायदेशीर प्रयत्न असल्याचे चित्रण केले. मारकडवाडी हा माळशिरस विधानसभा मतदारसंघाचा एक भाग आहे, जिथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते उत्तमराव जानकर यांनी त्यांचे भाजप प्रतिस्पर्धी राम सातपुते यांच्याविरुद्ध 13,147 मतांनी विजय मिळवला होता. पवार यांनी भारतीय निवडणूक आयोगाच्या मॉक पोल थांबवण्याच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि अशी कारवाई कोणत्या कारणास्तव केली, असा सवाल केला.

याला उत्तर देताना सोलापूरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भर दिला की लोकप्रतिनिधी कायद्यान्वये केवळ भारतीय निवडणूक आयोगाला निवडणुका घेण्याचा अधिकार आहे, ज्यात मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी तपासणी आणि समतोल साधला जातो. त्यांनी मारकडवाडी मॉक पोलची विश्वासार्हता फेटाळून लावली. निकाल घोषित झाल्यानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या उत्तम जानकर यांच्यासह उमेदवारांकडून ईव्हीएम पडताळणीसाठी कोणत्याही तक्रारी किंवा विनंत्या नसल्याबद्दल माहिती दिली.

त्यांनी चेतावणी दिली की पुराव्याशिवाय EVM बद्दल निराधार शंका उपस्थित करणे लोकशाहीची विश्वासार्हता कमी करत असल्याबद्दल त्यांनी इशारा दिला आणि नमूद केले की भारताचा निवडणूक प्रक्रियेवरील दृढ विश्वास बांगलादेश सारख्या देशांशी तीव्र विरोधाभास दर्शविणारा आहे जिथे निवडणुकांवरील अविश्वासामुळे अशांतता निर्माण झाली आहे. त्यांनी शंका असलेल्यांना आयोगाच्या वेबसाइटवरील तपशीलवार माहिती घेण्याचा सल्ला दिला.

जर शरद पवार ईव्हीएमवर इतके नाराज आहेत आणि बॅलेट पेपर वापरून मॉक पोलचे समर्थन करत असतील तर ते कर्जत जामखेडमध्ये मॉक पोलची मागणी का करत नाहीत, जिथे त्यांचा नातू रोहित पवार फक्त 1,243 मतांनी विजयी झाला? काँग्रेस नेते नाना पटोले यांनी अवघ्या 208 मतांनी विजय मिळविलेल्या साकोलीत मॉक पोलची मागणी ते का करत नाहीत? आणि त्यांच्या पक्षाचे नेते जानकर 13,000 मतांच्या फरकाने विजयी झाल्यावर मारकडवाडीबद्दल "चिंता" व्यक्त करण्याचे धाडस का करतात?

निवडणूक प्रक्रिया, ईव्हीएम आणि निवडणुकीच्या निष्पक्षतेबद्दल चुकीची माहिती पसरवण्याचा शरद पवारांचा वारंवार प्रयत्न यातून खऱ्या चिंतेऐवजी राजकीय डावपेचांचा नमुना दिसून येतो. स्पष्ट कायदेशीर आणि प्रक्रियात्मक उल्लंघन असूनही, मारकडवाडीतील बेकायदेशीर आणि वादग्रस्त मॉक पोलला त्यांचा पाठिंबा, त्यांच्या हेतू आणि विश्वासार्हतेबद्दल गंभीर प्रश्न निर्माण करतो. शिवाय, त्याचे निवडक क्षेत्रांतील निवडणुकांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह लावणे आणि इतर ठिकाणच्या अशाच परिस्थितीकडे दुर्लक्ष करणे म्हणजे यातून त्यांचा राजकीय संधीसाधू दिसून येतो.

# काहीही करा मात्र ट्रॅफिकमधून नऱ्हेकरांची सुटका करा

## सामजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांची मागणी



**पुणे - लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेतील समाविष्ट गावातील महत्त्वाचे महसुली गाव म्हणून मानले जाणारे नऱ्हेगाव हे सातत्याने चर्चेत येत आहे. सध्या वाहतूक कोंडीमुळे नऱ्हेकर प्रचंड त्रस्त झाले आहेत.

नऱ्हे गावातील ट्रॅफिकची समस्या तात्काळ सोडवण्यात यावी अशी मागणी सामजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी वाहतुक विभागाकडे केली आहे.

ट्रॅफिकमुक्तीसाठी भूपेंद्र मोरे यांनी पुढाकार घेतला आहे.

गंधर्व चौक ते पारे कंपनी चौक तसेच मानाजी नगर ते नऱ्हेगाव, श्री कंट्रोल चौक ते भूमकर चौक,रस्त्याला रोज सकाळी व संध्याकाळी प्रचंड मोठी ट्रॅफिक होत आहे. या भागात मेडिकल कॉलेज हॉस्पिटल, विविध शैक्षणिक संस्था, औद्योगिक संस्था यांचे मोठे कार्यक्षेत्र आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना वाहतूक कोंडीचा प्रचंड मोठा त्रास सहन करावा लागत आहे . ह्या भागातील सर्व रस्त्यावर रोज सकाळी व संध्याकाळी प्रचंड मोठी ट्रॅफिक होत आहे.

रस्त्यावर येणारी जड वाहने,अरुंद रस्ते, अतिक्रमणे यामुळे ही वाहतूक कोंडीत भर पडत आहे.

सर्वाधिक महसूल देणाऱ्या या गावांमध्ये भौतिक सुविधांसाठी अक्षरशः संघर्ष करावा लागला आहे.

त्यात या भागामध्ये लोकसंख्या वाढल्यामुळे वाहतुक ही प्रचंड वाढली आहे. रोज कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक यांची प्रचंड गैरसोय होत आहे.पाच मिनिटांच्या अंतरासाठी पाऊण तास वेळ लागतो आहे.

वाहतूक विभागाने योग्य ते उपाय योजना करण्यात यावे. गर्दीच्या वेळी चौकामध्ये वॉर्डनची नियुक्ती करावी. अनेक वर्षांपासूनच्या या वाहतूक कोंडीतून नऱ्हेकराना दिलासा द्यावा. अशी मागणी भूपेंद्र मोरे यांनी वाहतुक विभागाकडे केली आहे.

# थोडक्यात




## वैरागमध्ये ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीम

**बार्शी (आरंभ पर्व) :** वैराग शहरात शहराध्यक्ष सुरज वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली वंचित बहुजन आघाडी च्या वतीने ईव्हीएम विरोधात जन आंदोलन स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली आहे. भारतीय लोकशाही वाचवण्यासाठी ईव्हीम मतदान प्रक्रिया बंद केले पाहिजे . या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभर स्वाक्षरी मोहीम सुरु करण्यात आली आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडी बार्शी तालुका अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड व उपाध्यक्ष मनोहर कांबळे शहराध्यक्ष सुरज वाघमारे व वंचित बहुजन आघाडी बार्शी तालुका सहसचिव विश्वजीत साबळे ,धनंजय जगदाळे, राजरत्न डोळसे उपस्थित होते.




## मानवी तिरंगी ध्वजातून सैनिकांना मानवंदना देत ध्वजदिन साजरा

- जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् मधील २५० विद्यार्थ्यांनी साकारला तिरंगी ध्वज

**पुणे (आरंभ पर्व) :** पारतंत्र्याच्या काळात ध्वज हातात धरणे, वंदे मातरम् घोषणा देणे, हे कठीण होते. पण हातातील ध्वज जमिनीवर पडू न देण्यासाठी व त्याचे प्राणपणाने रक्षण करण्यासाठी देशभक्तांनी प्राणांची बाजी लावली. त्यामुळे भारतीय अस्मितेचे प्रतीक असलेल्या ध्वजाला मानवंदना देत आजी-माजी सैनिकांच्या कार्याला सलाम करीत मानवी तिरंगी ध्वज साकारून ध्वजदिन साजरा करण्यात आला. तब्बल 250 विद्यार्थ्यांनी मानवी तिरंगी ध्वज साकारुन आगळीवेगळी मानवंदना दिली. नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस तर्फे साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, देशाच्या सीमांचे व स्वातंत्र्याचे प्राणपणाने रक्षण करणा-या सैनिकांप्रती समाजाचे काही ऋण आहे. तसेच नागरी जीवनात उद्भविणा-या समस्या, वादळे यांसह नैसर्गिक आपत्तींमध्ये मदतकार्य करणा-या सैनिकांचेही आपल्यावर ऋण आहे. त्यामुळे त्यांना सलाम करण्याची संधी ध्वजदिनाच्या निमित्ताने साधत विद्यार्थ्यांनी हा ध्वज साकारला. तसेच लष्कराच्या तिन्ही दलांचे ध्वज देखील यावेळी साकारण्यात आले होते.




## 11 व 12 जानेवारी रोजी 'इंडिया सायन्स फेस्टिव्हल 2025' चे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फाउंडेशन फॉर ॲडव्हान्सिंग सायन्स ॲंड टेक्नॉलॉजी (फास्ट इंडिया) आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी (डीईएस) यांनी संयुक्तपणे 2025 मधील 'इंडिया सायन्स फेस्टिव्हल 2025 चे आयोजन (ISF) फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे 11 व 12 जानेवारी 2025 रोजी करण्याची घोषणा केली आहे. सहकार्याबद्दल बोलताना फास्ट इंडियाचे सह-संस्थापक वरूण अग्रवाल म्हणाले, “सहाव्या इंडिया सायन्स फेस्टला भव्य, उत्कृष्ट आणि अविस्मरणीय बनवणे गरजेचे आहे, जे भारताच्या विज्ञानातील महत्त्वाकांक्षा आणि यश यांना साजेसे असेल. या उद्दिष्टासाठी, आम्ही डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि फर्ग्युसन कॉलेजसोबत भागीदारी केल्याचा आम्हाला आनंद आहे. त्यांच्या 100+ वर्षांच्या अनुभवामुळे हा महोत्सव अधिक संस्मरणीय ठरेल. या उपक्रमाद्वारे विज्ञान, तंत्रज्ञान आणि त्यांचा नागरी जीवनावर होणारा प्रभाव साजरा करण्याची संधी मिळणार आहे.”

डीईएस पुणेचे अध्यक्ष प्रमोद रावत यांनी यावर प्रतिक्रिया देताना सांगितले, “डेक्कन एज्युकेशन सोसायटी नेहमीच शिक्षण आणि नवकल्पनांना चालना देण्यात अग्रेसर राहिली आहे. फास्ट इंडियासोबत इंडिया सायन्स फेस्टसाठीची भागीदारी ही युवा पिढीला प्रेरणा देण्यासाठी आणि विज्ञान अधिक सुलभ, आकर्षक व रोचक बनवण्यासाठी एक अद्वितीय संधी आहे. शिक्षण आणि विज्ञानाच्या प्रगतीद्वारे समाजाला पुढे नेण्याच्या आमच्या समान दृष्टिकोनाची ही भागीदारी पुष्टी करते.”

# पुण्यात सकल हिंदू समाजाच्यावतीने हिंदू रक्षा मोर्चा




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बांगलादेशातील हिंदू बांधवांवरील होणाऱ्या अत्याचाराचा निषेध करण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंदू रक्षा मोर्चा काढण्यात आला. राज्यभरात विविध ठिकाणी या घटनेचा निषेध करण्यात आला. गंज पेठेतील लहुजी वस्ताद साळवे तालीमपासून हा मोर्चा निघाला. सुमारे 500 ते 550 हिंदू बंधू भगिनी या मोर्चात सहभागी झाले होते.

बांगलादेश निर्माण झाल्यानंतर ठरलेल्या कराराप्रमाणे त्या देशातील धार्मिक स्थळे सुरक्षित राहून अल्पसंख्यांक नागरिक सुरक्षित राहतील, या अपेक्षेने हजारो हिंदू कुटुंबीय बांगलादेशमध्ये स्थिरावले. मात्र, या अपेक्षांचा भंग झाल्याचे सध्या दिसून येत आहे. अल्पसंख्यांक असलेल्या हिंदू समाजावर वारंवार अत्याचाराच्या घटना घडत आहेत. हिंदूंचे श्रद्धास्थान असलेली पुरातन मंदिरांची, मूर्तींची तोडफोड केली जाते. हिंदू महिलांवर बलात्कार केले जात आहेत. तसेच त्यांच्यावर अमानुष अत्याचार करून ठार मारण्यात येत आहे. हिंदूंच्या तसेच दलित बांधवांच्या मालमत्ता जमिनी अवैद्य मार्गाने बळकावून तसेच त्यांना बेघर केले जात आहे. त्याचप्रमाणे शत्रू संपत्ती अधिनियम बांगलादेशमध्ये कायदा आणला गेला असून तेथील मूळनिवासी हिंदूंना, हिंदू हे मुसलमान राष्ट्राचे शत्रू असल्याचे जाणीव करून कायद्याचा धाक दाखवून त्यांची जमिनी, घरे हडप केली जात आहे. तसेच या कायद्यामुळे तेथील मुसलमान समाजाच्या मनात हिंदू बद्दल द्वेष भावना प्रबळ केली जात आहे. या कायद्यामुळे हिंदू नागरिकांचे नागरिकत्वाचे अधिकार देखील, शत्रू राष्ट्राचे लोक म्हणून जबरदस्तीने काढले जात आहे. मूलभूत सरकारी सुविधा योजना त्या ठिकाणच्या हिंदूंना नाकारण्यात येत आहे. बहुसंख्य मुसलमान समाजाने अत्याचार केल्यास कायद्याने त्या मुसलमान नागरिकांना शिक्षा दिली जात नसल्याने हिंदूंचे जगणे अवघड बनले आहे. हिंदूंच्या धार्मिक प्रथा, रितीरिवाज, सण,कार्य यांचे पालन करून दिले जात नाही. तसे केल्यास त्यांचा सरकारी यंत्रणा त्याचप्रमाणे तेथील बहुसंख्य नागरिकांकडून अमानुष छळ होत आहे. त्यामुळे आता हिंदूंना त्याठिकाणी धर्मांतरण करणे अथवा पलायन करणे इतकेच मार्ग शिल्लक राहिलेले आहेत. त्यामुळे या हिंदू बांधवांवरील अत्याचारांच्या निषेधार्थ सर्व जगातील हिंदूंनी यापुढील काळात एकत्रित येण्याची गरज आहे आणि बांगलादेश मधील हिंदू बांधवांना वाचवणे हे आपले कर्तव्य आहे अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# मा. हरिदासभाऊ चरवड यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## चरवड यांच्या वाढदिवसानिमित्त "होम मिनिस्टर" कार्यक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेचे मा. नगरसेवक हरिदास भाऊ चरवड यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. वडगाव बुद्रुक येथील शिंदे मैदानावर हजारो नागरिकांच्या उपस्थितीमध्ये हा अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. चरवड यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या सर्व स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अभिष्टचिंतन सोहळ्यात चरवड यांना शुभेच्छा देण्यासाठी वडगाव व परिसरातील मान्यवरांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी खास महिला-भगिनींसाठी क्रांतिनाना मळेगावकर , सह्याद्री मळेगावकर आयोजित 'होम मिनिस्टर' (खेळ रंगला पैठणीचा) या मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमास महिला भगिनींनी प्रचंड प्रमाणात उपस्थिती दर्शवत हरिभाऊ चरवड यांना शुभ आशीर्वाद दिले..

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मा. नगरसेवक हरिदास चरवड यांच्या कार्य अहवालाचे व दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी माजी प्राचार्य सुधाकरराव जाधवर सर, प्रेममूर्ती नवनाथ महाराज लीमन, माजी नगरसेवक राघवेंद्र बापू मानकर, दत्ताभाऊ कोल्हे, शिवाभाऊ पासलकर, बाळासाहेब जाधव नानासाहेब जाधव, यांच्यासह चरवड कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार,महिला भगिनी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुणे महानगरपालिकेची प्रतिमा असलेला केक कापून हा वाढदिवस साजरा झाला. यावेळी बोलताना हरिदासभाऊ चरवड यांनी संघर्षमय परिस्थितीमध्ये ही साथ देणाऱ्या सर्व जनतेचे आभार मानले.. यापुढेही अधिक जोमाने कार्य करत राहणार असा शब्द त्यांनी यावेळी उपस्थितांना दिला.

# थोडक्यात




## डोणजेत खानापूर गटस्तरीय ॲथलेटिक्स, रांगोळी स्पर्धा संपन्न

**पुणे (आरंभ पर्व) :** विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय डोणजे येथे खानापूर गटस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेचे व रांगोळी स्पर्धेचे आयोजन शनिवार दिनांक 7 डिसेंबर रोजी करण्यात आले होते. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. सदर स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आजीव सदस्य बाळासाहेब पारगे, दिव्यांग विकास संस्था पुणेचे अध्यक्ष बाजीरावनाना पारगे, जि प सदस्य नवनाथदादा पारगे, माजी जि.सदस्या सौ. पूजाताई पारगे, डोणजे गावच्या सरपंच रोहिणीताई कुंभार, माजी सरपंच डोणजे नामदेव निढाळकर , सामाजिक कार्यकर्ते-दिलीप अण्णा पायगुडे पाटील, रामदास हगवणे, लक्ष्मण चव्हाण ,सुरेश वाल्हेकर, संभाजी पारगे, विठ्ठल वाल्हेकर व महेश पारगे, डोणजेच्या मुख्याध्यापिका गीता राऊत ,खानापूर विद्यालचे प्राचार्य सुभाष देशमुख, शिवणे विद्यालच्या प्राचार्या संगीता सावंत, व खानापूर गटाचे सर्व क्रीडा शिक्षक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी खेळाचे महत्व सांगितले . व खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री किवळे सर यांनी केले.आभार श्री ढमाळ सर यांनी मानले.



## विषबाधेतून सात दुबत्या गाईंचा मृत्यू : दोन शेतकऱ्यांचे नुकसान

**बार्शी (आरंभ पर्व) :** अज्ञात व्यक्तीने गायींच्या पिण्याच्या हौदामध्ये विषारी औषध टाकल्याने हिंगणी आर शिवारातील सात गाई व एक कालवड असे आठ जनावरे मृत्युमुखी पडले. गोठ्यात बांधलेल्या दूध दुबत्या गाईंचा मृत्यू झाल्याने सुमारे सात लाख रुपयांचे शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. याबाबत पृथ्वीराज मोहन देशमुख, सचिन देशमुख या शेतकऱ्यानी वैराग पोलिसात चौकशीसाठी फिर्याद दिली आहे. शेतकरी सचिन देशमुख व पृथ्वीराज देशमुख यांची हिंगणी येथे गट नंबर 11 / 1 अ येथे शेतजमिन आहे. त्या ठिकाणी जनावरे बांधण्यासाठी असणाऱ्या गाईंचा गोठा आहे. सदर ठिकाणी शुक्रवार दि. 6 व शनिवार दि. 7 तसेच दि.9 रोजी सात जर्सी गाई व एक कालवड यांचा मृत्यू झाला आहे. सदर गाई विषबाधा होऊन मरण पावल्या की घातपाताने मृत्यू पावल्या याबाबत चौकशी करण्याची मागणी सदर अर्जामध्ये शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे. दोन्ही शेतकरी अल्पभूधारक असून ते हिंगणे आर शिवारात एक हेक्टर क्षेत्रामध्ये दुग्ध व्यवसाय , शेती करतातकरतात. अत्यंत खडतर परिस्थितीमध्ये कुटुंबाचा गाडा चालवण्यासाठी देशमुख बंधूंनी केलेल्या या अथक परिश्रमास या दुःखद घटनेने मोठा फटका बसला आहे. या दुःखद घटनेमुळे संपूर्ण शिवारामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. गेल्या काही वर्षापासून सर्व शेतकरी बांधवांवर वाईट दिवस आले आहेत. अशा परिस्थितीमध्ये दूधदुबत्या गाईंचा मृत्यू होणे म्हणजे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. या घटनेची चौकशी करून संबंधितांना न्याय द्यावाया दोन्ही शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत करावी. अशी मागणी होत आहे. वैराग पोलीस स्टेशनचे अधिकारी या घटनेचा तपास करत आहेत.

ह्या दुःखातून सावरणे अत्यंत कठीण आहे.शासनाने दोन्ही शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी. शेतकरी जगला तर देश जगेल. भरीव मदत शासनाने करावी.

- प्रशांत देशमुख, प्रगतशील शेतकरी, धामणगाव (दू)

# आंतरशालेय, महाविद्यालयीन 6वा जाधवर विज्ञान महोत्सव

## प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, विज्ञान विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहयोगाने 'सहाव्या जाधवर सायन्स फेस्टिव्हल' या राज्यस्तरीय विज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. शनिवार, दिनांक 28 डिसेंबर 2024 रोजी सकाळी नऱ्हे येथील डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल - 1 येथे महोत्सव होणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळाच्या सहकार्याने हा कार्यक्रम होणार आहे. महोत्सवामधील स्पर्धा शालेय (इयत्ता 8 वी ते 10 वी), कनिष्ठ (इयत्ता 11 वी व 12 वी), वरिष्ठ महाविद्यालय (पदविका शिक्षण) आणि पदव्युत्तर व खुल्या अशा चार गटात होणार आहे. सायन्स सोसायटी आणि टेक्नॉलॉजी या मुख्य संकल्पनेंतर्गत नॅशनल एनर्जी कन्झर्व्हेशन, प्युरिफिकेशन मेथड फॉर वॉटर एअर सॉईल, बॅटरी फ्रॉम वेस्ट, बायो फ्युएल फ्रॉम ॲग्रीकल्चर वेस्ट, स्मार्ट एआय बेस रोबोट, बायो मेडिकल वेस्ट प्युरिफिकेशन, स्मार्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट, टेक्नॉलॉजी इन व्हेईकल इंडस्ट्री अशा विविध संकल्पनांवर विद्यार्थी प्रकल्पाचे सादरीकरण करणार आहेत. विजेत्यांना एकूण 1 लाख रुपयांची पारितोषिके व ट्रॉफी देण्यात येणार आहेत.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, 'जाधवर सायन्स फेस्टिव्हल' या राज्यस्तरीय विज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांसाठी हा एक अभिनव व आदर्श उपक्रम असणार आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व्यासपीठ मिळणार आहे. विज्ञान विषयाची विद्यार्थ्यांना आवड निर्माण व्हावी, यासाठी विविध उपक्रम संस्थेतर्फे राबविण्यात येतात. स्पर्धेत सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याला प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे. नोंदणीची अंतिम तारीख 24 डिसेंबर असून गटाप्रमाणे अनुक्रमे 7798101122, 9764707379, 7972483575, 9067909075 या क्रमांकावर संपर्क साधावा. तरी विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

**संशोधन करणा-या विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांची शिष्यवृत्ती**

भारताबाहेरील इतर देशांमध्ये संशोधन करुन पेटंट मिळविण्याचे प्रमाण अधिक आहे. भारतामध्ये संशोधन व पेटंटचे प्रमाण कमी असून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटने अभिनव योजना सुरु केली आहे. इन्स्टिट्यूटमधील संशोधन करणा-या विद्यार्थ्याला विनातारण १० लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विषयाची गोडी निर्माण होत अधिकाधिक संशोधनास युवावर्ग प्रवृत्त होईल, असे ॲड. शार्दुल जाधवर यांनी सांगितले.

## विलो ने सादर केली आधुनिक फर्टिगेशन ट्रॉली

**पुणे : (दै. आरंभ पर्व)**

जलव्यवस्थापन क्षेत्रातील आघाडीची कंपनी विलो ने फर्टिगेशन ट्रॉली सादर केली आहे. ही प्रणाली सिंचन व खत व्यवस्थापन एकत्रित करते. सौरऊर्जेवर चालणाऱ्या या यंत्रामुळे खतांचा वापर 40% कमी होतो, पिकांचे उत्पादन 30% वाढते आणि पाण्याचा वापर नियंत्रित होतो, ज्यामुळे शेतकऱ्यांसाठी प्रभावी व उपयुक्त उपाय मिळतो. भारतीय शेती क्षेत्राला नेहमीच उच्च उत्पादन खर्चाचा सामना करावा लागतो. विलो ची फर्टिगेशन ट्रॉली पिकांना त्यांच्याला आवश्यक त्या टप्प्यावर योग्य प्रमाणात पाणी व पोषकतत्व पुरवते. यामुळे संसाधनांची बचत होते, मजुरीचा खर्च कमी होतो आणि उत्पादन खर्चात घट होते. 'मेक इन इंडिया' उपक्रमाशी सुसंगत असलेल्या या फर्टिगेशन ट्रॉली चे उत्पादन भारतातच केले जाते. त्यामुळे सुटे भाग आणि सेवेसाठी शेतकऱ्यांना सहज उपलब्धता मिळते. ही प्रणाली कमी खर्चात टिकाऊ उपाय प्रदान करते. पुण्यातील सद्गुरू फार्म्सचे श्री. दिलीप काळे यांनी त्यांच्या शेतात Fertigation Trolley चा वापर करून उत्पादन वाढवले व पाण्याचा योग्य वापर केला. त्यांच्या शेताने परिसरातील शेतकऱ्यांसाठी आदर्श निर्माण केला आहे आणि अनेक शेतकरी या प्रणालीचा अनुभव घेण्यासाठी पुढे सरसावले आहेत. विलो च्या वॉटर मॅनेजमेंट विभागाचे प्रमुख श्री. रवींद्र उळंगवार म्हणाले, "ही प्रणाली शेतकऱ्यांना पाणी व खतांचा योग्य वापर करण्यात मदत करते.

## नवले पुलावरील वाहतूक कोंडीसाठी दोडके "दिल्ली दरबारी"



आपल्या कर्तव्यदक्ष खा. सुप्रियाताई सुळे यांच्यासोबत आगामी काळातही खडकवासला मतदारसंघातील जे प्रश्न विधानसभा निवडणुकीमध्ये मी जे प्रश्न मांडले त्यावर मीही नक्कीच पाठपुरावा करणार आहे. जनतेचे महत्वाचे प्रश्न सोडवण्याकडे माझाही भर असणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वरील वाहतूक कोंडीबाबतमागील दोन-तीन वर्षापासून आम्ही पाठपुरावा करत आहोत.आगामी काळात या रस्त्यावरील वाहतुक कोंडी दूर होईल.

**- सचिन दोडके, मा. नगरसेवक**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील विधानसभा निवडणुकीमधील महाविकास आघाडीचे पराभूत उमेदवार सचिन दोडके यांनी थेट "दिल्ली दरबारी" खडकवासला मतदारसंघातील प्रश्न मांडले.

नवले ब्रिजवरील वाहतूक कोंडीबाबत खा. सुप्रियाताई सुळे यांच्या उपस्थितीत रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सदरील वाहतूक कोंडीबाबतच्या उपाययोजनाचा प्रस्ताव दोडके यांनी गडकरी यांच्याकडे मांडला आहे.

दरम्यान, ह्या महामार्गावर असणाऱ्या स्वामीनारायण मंदिर ते वारजे ओव्हर ब्रिजच्या सुमारे 3800 कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम लवकरच सुरू होत आहे. यामध्ये प्रामुख्याने खडकवासला नऱ्हे येथील भूमकर चौकातील सद्यस्थितीत असणारा पूल दुपटीने रुंद करण्यात यावा. तसेच नवले ब्रिज परिसरामध्ये अपघात रोखण्याकरिता अधिकच्या उपाययोजना करण्यात याव्या यासाठी निवेदन देण्यात आले.

यावेळी या निवेदनाबाबतीत आवश्यक त्या उपाययोजना केले जातील असं आश्वासन गडकरी यांनी यावेळी दिले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे, धैर्यशील मोहिते पाटील निलेश लंके, इतर खासदार, पुण्याचे युवा नेते गिरीश भाऊ शितोळे उपस्थित होते.

"क्या हार में क्या जीत में ,
दौडता रहुंगा जन हीत में "म्हणत खडकवासला मतदारसंघातील जनतेसाठी दोडकेंचे प्रयत्न पाहून आगामी काळातही ते जनतेच्या प्रश्नासाठी सक्रिय राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जनतेचे चांगले समर्थन मला मिळाले. त्यामुळे त्यांच्यासाठी जनतेचा सेवक म्हणून मी नक्कीच काम करणार आहे.

## ॲड. प्रसन्नदादा जगताप यांची सिंहगड रोड भागातील बजरंग दलाच्या रक्तदान महायज्ञास भेट



**रक्तदान ही काळाची गरज : ॲड. जगताप**

पुणे व शहर परिसरामध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. अशावेळी बजरंग दलाच्यावतीने आयोजित हा उपक्रम स्तुत्य आहे. आपण सर्वांनी रक्तदान करणे काळाची गरज आहे कारण रक्त हे फक्त शरिरातच बनते. अनेक गरजू रुग्णांना हे रक्त मिळत असल्याने एक पुण्याचे कार्य पार पडले..

**- ॲड. प्रसन्नदादा जगताप, माजी उपमहापौर**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विश्व हिंदू परिषद बजरंग दल यांच्यावतीने सीमेवरील हुतात्मा जवान आणि राम जन्मभूमी आंदोलनातील हुतात्मा कारसेवक कोठारी बंधू यांच्या स्मरणार्थ भव्य रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. पुण्यातील विविध भागात सतरा ठिकाणी हा रक्तदान महायज्ञ पार पडला. सिंहगड रोड भागातील रक्तदान महायज्ञास भाजपाचे पुणे शहराध्यक्ष धीरजजी घाटे तसेच विश्व हिंदू परिषदेचे प्रमुख किशोरजी चव्हाण तसेच हक्काचा माणूस म्हणून ओळख असलेले माजी उपमहापौर ॲड प्रसन्नदादा जगताप यांनी विविध ठिकाणी भेट दिल्या.

2055 रक्तदात्यांनी या रक्तदान महायज्ञास सहभाग नोंदवला. सिंहगड रोड परिसरात मनपा शाळा हिंगणे खुर्द, आनंद मारुती मंदिर आनंदनगर, वांजळे जलतरण तलाव, सन सिटी, माणिक बाग, अभिरुची हॉल या ठिकाणी रक्तदान महायज्ञ पार पडले. यावेळी ॲड. प्रसन्न दादा जगताप यांनी रक्तदानाच्या ठिकाणी भेट देऊन रक्तदात्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या हस्ते रक्तदात्यांना प्रशस्तीपत्रक आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे, तसेच बजरंग दलाचे कार्यकर्ते व ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्रपरिवार आणि कार्यकर्ते उपस्थित होते.




## चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान पुणेकरांना मंत्रमुग्ध केले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

द रॅबिट हाऊस, एक आतुरतेने वाट पाहत असलेल्या फीचर फिल्मच्या टीमने त्यांच्या भारतभरातील प्रमोशनल टूरचा एक भाग म्हणून पुण्याला भेट दिली, जे सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध शहरातील एक संस्मरणीय थांबा म्हणून ओळखले जाते. ट्रेलरने आठवडाभरात यूट्यूबवर 1 दशलक्ष व्ह्यूज ओलांडल्याने, चित्रपटाच्या सभोवतालची चर्चा स्पष्टपणे दिसून येत आहे आणि पुणेकरांनी कलाकार आणि क्रू यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. हिमाचलच्या खोऱ्यात वसलेली कथा द रॅबिट हाऊस या चित्रपटाचे चित्रीकरण हिमाचल प्रदेशातील सुंदर खोऱ्यांमध्ये करण्यात आले आहे. ही कथा एका नवविवाहितेची आहे जी तिच्या मर्यादित वैवाहिक जीवनात OCD या आजाराने त्रस्त असलेल्या तिच्या पतीसोबत स्वातंत्र्य शोधत आहे.

मानसिक आरोग्य, सामाजिक मूल्ये आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांना हा चित्रपट स्पर्श करतो. चित्रपटाचे दिग्दर्शक वैभव कुलकर्णी म्हणाले, "ही केवळ एक कथा नाही, तर त्या अडचणींवर चर्चा आहे ज्याबद्दल लोक सहसा बोलत नाहीत.

# 'क्राफ्टन इंडिया'चा 'कुकीरन इंडिया' डाउनलोडसाठी उपलब्ध




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'क्राफ्टन, इंडिया 'ने 'डेव्हसिस्टर्स'च्या सहकार्याने 'कुकीरन इंडिया' हा नवा कॅज्युअल रनर मोबाइल गेम आता अँड्रॉइड आणि आयओएस मोबाइलवर डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे, असे जाहीर केले आहे.

खास करून भारतीय दर्शकांसाठी निर्माण केलेल्या या गेममधील पात्रे सर्वांना आवडणाऱ्या गुलाबजाम आणि काजू कतली कुकीजसारख्या मिठायांपासून प्रेरणा घेऊन तयार केली आहेत. गेमला स्थानिक तडका देण्यासाठी टायनी तबला आणि पॅरट दादासारखे वैशिष्ट्यपूर्ण पाळीव प्राणीही त्यात आहेत. यांसह भारताचा नकाशा आणि गेमअंतर्गतच भारतीय कार्यक्रमांचा समावेश आहे. गेममधील खेळाडू 'कुकी' पात्राची निवड करतात आणि उडी मारून व अडथळ्याखालून घसरगुंडी करून पॉइंट्स मिळवतात. त्यामुळेच हा गेम अत्यंत मजेदार आणि गुंतवून टाकणारा अनुभव देतो. मित्रांना आणि कुटुंबीयांना आनंद मिळेल अशा तऱ्हेने या गेमची रचना केलेली असून मौज कायम ठेवण्यासाठी त्यात लीडरबोर्डसह अन्य सामाजिक वैशिष्ट्यांचा अंतर्भाव केला आहे. सादरीकरणाच्या केंद्रस्थानी थोर कुस्तीपटू 'दि ग्रेट खली' ही डिजिटल फिल्म ठेवण्यात आली आहे. या फिल्ममध्ये एका मजेदार वळणावर आता आपण धावणार आहोत, अशी घोषणा करून खली सगळ्यांना धक्का देतो. या अनपेक्षित वृत्ताने लोक उत्तेजित होऊन आरडाओरडा करत प्रतिक्रिया देतात. आपण 'कुकीरन इंडिया'मध्ये धावणार असल्याचे जाहीर करून या गोंधळातला खिलाडूपणा आणखी वाढतो. या सोप्या गेममध्ये, रोमांचक आव्हानांनी आणि आनंद देणाऱ्या अनुभवांमुळे गेमची रंगत वाढत जाते.

मोबाइल गेमचे रंगतदार आकर्षण आणि खलीची वास्तवापेक्षाही अधिक रोमांचक प्रतिमा यांच्या काल्पनिक मिलाफामुळे गेमचे सादरीकरण खरेचच अविस्मरणीय झाले आहे. ही जादू आणखी रम्य करण्यासाठी 'ओह कुकी रन रन रन' हे आकर्षक जिंगलही वाजत राहाते. त्यामुळे प्रत्येक प्रसंग उर्जादायी बनतो आणि फिल्म संपल्यावरही दर्शकांच्या मनात कथा रेंगाळत राहते.

क्राफ्टन इंडियाचे पब्लिशिंग प्रमुख मिनू ली यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'डेव्हसिस्टर्सच्या सहकार्याने आम्ही कुकीरन इंडिया प्रत्यक्षात आणला आहे. त्याला मिळालेल्या अतुलनीय प्रतिसादामुळे आम्ही भारावून गेलो आहोत. या गेममध्ये मौज आणि भारतीय घटकांचा अचूक मिलाफ झाला आहे. हा गेम भारतीय खेळाडूंसाठी खास तयार केला असून त्यांच्या लाडक्या मालिकेसाठी त्यांना एक नवा अनुभव देत आहे.'

ली यांनी पुढे सांगितले, की 'क्राफ्टन इंडियासाठी 2024 हे वर्ष उल्लेखनीय ठरले. 2025 मध्ये देशात आणखी तीन-चार गेम सादर करून ही गती कायम ठेवण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. धोरणात्मक गुंतवणूक आणि स्थानिक गुणवत्तेचा पुरस्कार यांच्यासह आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून भारताच्या गेमिंग उद्योगाचा चेहरामोहराच बदलून टाकण्याची आणि प्रगतीशील, सर्वसमावेशक गेमिंग परिसंस्था निर्माण करण्याची आमची दृष्टी प्रतिबिंबित होते.'

'कुकीरन इंडिया'च्या साह्याने भारतीय दर्शकांसाठी सहजसुलभ मौज आणि स्थानिक घटकांचे अनोखे मिश्रण करून कॅज्युअल गेमिंग क्षेत्राचा चेहरामोहराच बदलून टाकण्यास 'क्राफ्टन' सज्ज झाली आहे.

## थोडक्यात



### घोषणापत्र खोटे ठरल्याने आर्थिक दुर्बल घटक दाखला रद्द

- तहसीलदार ज्योती देवरे यांचा निकाल

**राजगुरूनगर(आरंभ पर्व)** : राजगुरूनगरयेथील कृषि उत्पन्न बाजार समिती खेडचे संचालक अशोक राक्षे यांचा आर्थिक दुर्बल घटक दाखला (प्रमाणपत्र) तहसीलदार ज्योती देवरे यांनी रद्द ठरवला. दाखला रद्द झाल्याने खेड तालुक्यात विविध राजकीय चर्चांना उधाण आले आहे. दाखला मिळवताना राक्षे यांनी सोबत जे घोषणापत्र दाखल केले होते, ते खोटे ठरले असून त्यावरुन पोलिसांत लेखी तक्रारअर्ज देऊन योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश तहसीलदार देवरे यांनी दिले आहेत. या प्रकरणाची सोमवारी (दि.9) तहसिल कार्यालियात सुनावणी झाली. त्यावेळी राक्षे समर्थकांनी तहसील कार्यालियात येऊन कामकाजात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला, त्यावरूनही तहसीलदार देवरे यांनी एका शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या विरोधात कामकाजात अडथळा अशा आशयाची तक्रार पोलिसांत केली आहे. ज्यांच्या विरोधात तक्रार केली त्यांनीही तहसीलदार यांच्या विरोधात तक्रार केली असल्याचे समजते. अ‍ॅड. निलेश आंधळे यांनी तक्रारदार महिलेच्या बाजूने युक्तिवाद केला. बाजार समितीचे संचालक राक्षे हे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या समर्थनार्थ राहुन पुर्वी निवडून आले होते. मात्र काही महिन्यांपूर्वीच त्यांनी मोहिते यांच्या विरोधात भूमिका घेतली. बाजार समितीच्या सभापती, उपसभापती निवड होताच विधानसभा निवडणूक आली. त्यात मोहीतेंना अपयश आले. तालुक्यातील मोठ्या राजकिय घडामोडींना बाजार समितीच्या सभापती, उपसभापती निवडीपासून प्रारंभ झाल्याचे मानले जाते. दरम्यान, याबाबत बोलताना अशोक राक्षे म्हणाले, राजकिय द्वेषाने, सूडबुद्धीने हा निकाल दिला आहे. न्यायालयीन लढा करून यातील चुकीच्या गोष्टी जनतेसमोर आणणार आहे. माझ्या संचालक पदावर किंवा बाजार समिती मधील सभापती उपसभापती निवडीवर याचा कोणताही परीणाम होणार नाही.



### कनेरसर गावात कृषिदुतांचे स्वागत

**राजगुरूनगर(आरंभ पर्व)** : ग्रामीण कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापिठ -राहुरी विद्यापीठ संलग्न, पद्मभूषण वसंतदादा पाटील कृषि महाविद्यालय येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे कृषीविषयक अभ्यासक्रमासाठी कनेरसर (ता. खेड ) येथे आगमन झाले. ग्रामस्थांनी या कृषिदुतांचे उत्साहात स्वागत केले. कनेरसर येथील शेतकरी घेत असलेल्या पिकपद्धती, शेतीसह कृषी संलग्न व्यवसायाबद्दल माहिती घेत, शेतकऱ्यांना आधुनिक पीकपद्धती, तंत्रज्ञान, विकास योजना , बीज प्रक्रिया व त्यासंबंधीत उपलब्ध माहितीचे चर्चासत्र घेवून माहितीची आदान-प्रदान पुढील तीन महिने हे कृषिदुत करणार आहेत. कृषिदुतांच्या स्वागतप्रसंगी आमदार बाबाजी काळे, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब खरपुडे, सुदाम कराळे, बाबाजी दौंडकर व स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी रांगोळी व इतर पर्यावरणपुरक वस्तुंपासून तयार केलेली गावाची प्रतीकृती पाहुन कृषीदुत विद्यार्थी व मान्यवर भाराऊन गेले. यावेळी मान्यवरांची समायोचित भाषणे झाली. कृषिदूत अक्षय निकम, आदित्य राऊत, अक्षय तांबे अभिजित कोऱ्हाळे, गहिनीनाथ घागरे, हर्षण चौधरी, श्रेयस भुजबळ यांनी अभ्यासविषयक प्रयोजन उपस्थितांना कथन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्रा. मोडक, प्रा. घाडगे , प्रा. खरे , प्रा. जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिदुतांचा अभ्यासक्रम पूर्ण केला जाणार आहे.

### राजगुरूनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**राजगुरूनगर(आरंभ पर्व)** : राजगुरूनगर येथे प्रतिवर्षींप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. येथील अंखंड हरिनाम सप्ताहाचे हे 45 वे वर्ष असून त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण मंडळाचे अध्यक्ष तथा राजगुरूनगरचे माजी सरपंच शांताराम घुमटकर व प्रदीप कासवा यांनी दिली. या सप्ताहाचा प्रारंभ गुरुवार पासून (दि. 12) होत असून दि. 19 डीसेंबर रोजी या सप्ताह कार्यक्रमाची सांगता होणार आहे. सप्ताह काळात दररोज पहाटे काकड आरती, सकाळी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, विष्णू सहस्त्रनाम, दुपारी नेमाचे भजन, सायंकाळी हरिपाठ, त्यानंतर हरिकीर्तन आणि अखंड वीनानाद असे कार्यक्रम होणार आहेत. येथील ज्ञान मंदीरात नियमीत बारमाही ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व हरीपाठ हे कार्यक्रम होत असतात. सप्ताह कालावधीत ह.भ.प. भरत महाराज थोरात ( वडगाव पाटोळे), रामचंद्र महाराज इंगोले (पुणे), बबन महाराज शिनलकर (लोणी- धामणी), तुकाराम महाराज मुंडे शास्त्री (परळी), सागर महाराज बोराटे (नातेपुते), सोपान महाराज सानप शास्त्री ( हिंगोली), माऊली महाराज पठाडे (कर्जत- अहिल्यानगर), पोपट महाराज राक्षे ( वेहेळदरा) यांची कीर्तने होणार आहे.

# एअरटेलने स्पॅम सोल्यूशन सुरु केल्यापासून त्याच्या नेटवर्कवर पाहिलेल्या ट्रेंडचे विश्लेषण करणारा स्पॅम अहवाल जारी केला

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारती एअरटेल भारतातील पहिले स्पॅम-फायटिंग नेटवर्क आहे आणि त्याने तब्बल 8 बिलियन स्पॅम कॉल्स व 0.8 बिलियन स्पॅम एसएमएस चिन्हांकित केले आहेत. हे त्याने एआय-संचालित, स्पॅम-फायटिंग सोल्यूशन सुरू केल्यानंतर अडीच महिन्यांच्या आत करून दाखविले आहे. या प्रगत अल्गोरिदमचा वापर करून, एआय-संचालित नेटवर्कने दररोज सुमारे 1 मिलियन स्पॅमर्सची सफलतापूर्वक ओळख पटविली आहे. गेल्या अडीच महिन्यांमध्ये कंपनीने सुमारे 252 मिलियन असाधारण ग्राहकांना या संशयास्पद कॉल्सबाबत धोक्याची सूचना दिली असून तसे कॉल्स उचलणाऱ्या ग्राहकांची संख्या 12% नी घटली आहे, असे निदर्शनास आले आहे. एअरटेल नेटवर्क




वरील सर्व कॉल्सपैकी सहा टक्के कॉल्सची ओळख स्पॅम कॉल्स म्हणून पटविली गेली आहे, तर सर्व एसएमएस पैकी 2% स्पॅम असल्याची ओळख पटविली गेली आहे. विशेष म्हणजे तब्बल 35% स्पॅमर्सने लॅंडलाईन टेलिफोनचा वापर केल्याचे निदर्शनास आले आहे.

याव्यतिरिक्त, दिल्ली मधील ग्राहकांना सर्वात जास्त स्पॅम कॉल्स केले गेले आहेत, त्या पाठोपाठ आंध्र प्रदेश आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील ग्राहकांना असे कॉल्स केले गेले आहेत.

सर्वात जास्त स्पॅम कॉल्स दिल्लीत सुरू झाले असून, त्या पाठोपाठ मुंबई आणि कर्नाटकचा क्रमांक लागतो. एसएमएस च्या बाबतीत म्हणायचे झाले तर सर्वात जास्त संख्या गुजरात मधून सुरू झाली होती आणि त्या पाठोपाठ कोलकाता आणि उत्तर प्रदेश मध्ये कॉल्स सुरू झाले आणि मुंबई, चेन्नई आणि गुजरात मध्ये लक्ष्यित ग्राहकांची जास्तीत जास्त संख्या पहायला मिळते. ट्रेंड पहायला गेलो तर एकूण स्पॅम कॉल्सपैकी 76% कॉल्स मध्ये पुरुष ग्राहकांना लक्ष्य केले गेले होते. याव्यतिरिक्त, वयोगटातील लोकसंख्येमध्ये स्पॅम कॉल वारंवारतेच्या बाबतीत भिन्न फरक दिसून आले आहेत. 36 ते 60 वयोगटातील ग्राहकांना सर्व स्पॅम कॉल्सपैकी 48% कॉल्स केले गेले होते, तर 26-35 वयोगटातील ग्राहकांना त्यानंतर सर्वात जास्त लक्ष्य केले गेले होते आणि हे स्पॅम कॉल्सच्या 26% आहे. सुमारे 8% स्पॅम कॉल्स ज्येष्ठ नागरिकांच्या हॅंडसेटमध्ये पहायला मिळतात. स्पॅम हालचालींचे तासागणित वितरण सुद्धा कंपनीच्या निष्कर्षांनी स्पष्ट केले आहेत. स्पॅम कॉल्स सकाळी 9 वाजल्यापासून सुरु होतात आणि जसजसा दिवस वाढत जातो तसतसे हळूहळू त्यांचे प्रमाण वाढत जाते.

दुपार 12 ते दुपारी 3 या वेळेत स्पॅम हालचालींचा शिखर पाहिला गेला असून यादरम्यान स्पॅम कॉल्सचे प्रमाण सर्वात जास्त असल्याचे आढळते. याखेरीज, आठवड्यातील दिवस आणि आठवड्याच्या शेवटी स्पॅम कॉल्सच्या वारंवारतेत उल्लेखनीय तफावत आहे. रविवारी या कॉल्सचे प्रमाण सुमारे 40% नी कमी होते. विशेषतः रु. 15,000 ते रु. 20,000 च्या किंमतीच्या श्रेणीतील डिव्हाइसेसवर सर्व स्पॅम कॉल्सच्या अंदाजे 22% कॉल्स केले जातात.

> अनेक मापदंडांची बारकाईने तपासणी केली गेली आहे आणि एआय- संचालित प्रणालीला विलक्षण अचूकता राखून वास्तविक काळात ही नको असलेली लुडबूड ओळखता आलेली आहे. या अभूतपूर्व उपक्रमाने एअरटेलला भारतातील पहिली सेवा प्रदाता म्हणून ठामपणे स्थापित केले आहे जिने स्पॅमच्या वाढत्या धोक्यावर सर्वसमावेशक तोडगा प्रदान केला आहे, विशाल ग्राहक आधाराच्या गोपनीयता आणि सोयीला प्राधान्य देणाऱ्या सर्वसमावेशक सुरक्षा उपायांसाठी नवीन उद्योग मानके स्थापित केली आहेत. भारत सरकारने (जीओआय ने) सेवा आणि व्यवहार कॉल्ससाठी 160 प्रेफिक्स असलेले 10 अंकी क्रमांक निश्चित केले आहेत. ग्राहक हे बँका, म्युच्युअल फंड, विमा कंपन्या, शेअर ब्रोकर्स, इतर वित्तीय संस्था, कॉर्पोरेट्स, उद्योग, एसएमई, मोठे आणि लहान व्यवसाय यांना देण्यात आलेल्या या 160-प्रेफिक्स श्रेणींमधून कॉल्स येण्याची अपेक्षा करू शकतात कारण या श्रेणी व्यवहार आणि सेवा कॉल्स करण्यासाठी वापरल्या जातात. याव्यतिरिक्त, डू-नॉट-डिस्टर्ब (डीएनडी) चा पर्याय न निवडणाऱ्या आणि प्रचारात्मक कॉल्स प्राप्त करण्यासाठी सबस्क्राइब करणाऱ्या ग्राहकांना 140 प्रेफिक्स असलेल्या 10 अंकी क्रमांकावरून ते प्राप्त होणे सुरू राहिल.



## पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयात जागतिक मानवी हक्क दिन साजरा

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

उरुळी कांचन येथील पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी मूलभूत मानवी हक्क असलेले फलक हाती घेत विद्यार्थ्यांमध्ये जागृतीसाठी प्रयत्न केले. यानिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांना मानवी हक्क दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

'आमचे हक्क, आमचे भविष्य, आत्ता' अशी यावर्षीची मुख्य कल्पना असल्याचे सांगून जगातील प्रत्येकाला माणूस म्हणून समानतेचा हक्क असला तरी गरिबी ही आजदेखील अनेक देशांमधील लोकांना मानवी हक्क आणि अधिकारांपासून वंचित ठेवत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## रायन इंटरनॅशनल अकॅडमीकडून वर्ल्ड एड्स डे मॅरेथॉनचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रायन इंटरनॅशनल अकॅडमी, हिंजवडीने सामुदायिक मॅरेथॉनचे आयोजन करत जागतिक एड्स दिनाबाबत प्रबळ निवेदन केले. या मॅरेथॉनमध्ये एड्स जनजागृती आणि सामुदायिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासोबत पाठिंबा देण्याच्या मिशनमध्ये 184 रनर्स एकत्र आले. मॅरेथॉनच्या दुसऱ्या एडिशनमध्ये 4.4 किलोमीटरचे अंतर पार करण्यात आले, जेथे रायन इंटरनॅशनल अकॅडमी स्कूलच्या परिसरापासून मॅरेथॉनची सुरुवात होत मेगापोलिस सर्कलवर शेवट झाला. यामधून संस्थेची सामाजिक जबाबदारी आणि सामुदायिक




सहभागाप्रती कटिबद्धता दिसून आली. ट्रायथलॉन राष्ट्रीय व आशिया-स्तरीय सुवर्ण पदकविजेत्या मानसी मोहिते यांनी उपस्थिती दाखवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यांनी मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवला, तसेच सहभागींना आपल्या उल्लेखनीय अ‍ॅथलेटिक उपलब्धींसह प्रेरित केले. विविध वयोगटातील रनर्सनी उल्लेखनीय उत्साह व समर्पितता दाखवली, तसेच सहयोगात्मक कृतीचा उत्साह दाखवला.

या मॅरेथॉनबाबत मत व्यक्त करत रायन इंटरनॅशनल अकॅडमी, हिंजवडीच्या मुख्याध्यापिका सोनिका कोच्छर म्हणाल्या, "आमची मॅरेथॉन रनपेक्षा अधिक असून सर्वसमावेशकतेचा संदेश प्रसारित करते आणि एड्स झालेल्या व्यक्तींना पाठिंबा देते.

यंदाची थीम 'योग्य मार्ग निवडा: माझे आरोग्य, माझा अधिकार आमचे दूरदश अध्यक्ष डॉ. ए. एफ. पिंटो यांनी सुरू केलेल्या सामुदायिक परिवर्तनाच्या आमच्या दृष्टिकोनाशी संलग्न आहे.

मॅरेथॉनमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या रनर्सना सन्मानित करण्यात आले, जेथे मुले, महिला व पुरुष या तीन श्रेणींमधील टॉप परफॉर्मर्सना पदक व टी-शर्ट्सह गौरविण्यात आले. श्री. केतन सर्वात वेगवान धावपटू ठरले, ज्यांनी 32 मिनिटांमध्ये 4.4 किमी अंतर पार केले, तर श्रीमती अनु शर्मा 45 मिनिटांमध्ये अंतर पार करत महिलांच्या श्रेणीमध्ये अव्वल ठरल्या.

## हायलँडर आणि टोकियो टॉकीजचा महाराष्ट्रात प्रवेश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हायलँडर आणि टोकियो टॉकीज या भारतातील आघाडीच्या फॅशन ब्रॅण्ड्समध्ये गणना होणाऱ्या ब्रॅण्ड स्टुडिओ लाइफस्टाइलच्या छत्राखालील ब्रॅण्ड्सनी पुण्यात पहिले रिटेल स्टोअर सुरु करून महाराष्ट्रात अधिकृतरित्या प्रवेश केला आहे. 2025 सालापर्यंत शहराभरात 6 रिटेल स्टोअर्स प्रस्थापित करण्याची योजना असून, यातील पहिले स्टोअर नुकतेच अ‍ॅमानोरा मॉलमध्ये उघडण्यात आले. याशिवाय बाणेर, हिंजवडी, फग्युसन रोड, कोथरूड आणि विमाननगर या भागांमध्ये आणखी स्टोअर्स सुरू




केले जाणार आहेत. अ‍ॅमानोरा मॉलमध्ये नव्यानेच सुरू करण्यात आलेले 5,000 चौरस फूट जागेतील स्टोअर हा प्रत्यक्ष (ऑफलाइन) व्यवसाय भक्कम करण्याच्या उद्देशाने राबवल्या जाणाऱ्या ब्रॅण्डच्या विस्तार धोरणातील महत्त्वपूर्ण टप्पा आहे. स्वेटशर्ट्स, क्रॉप टॉप्स, स्वेटर्स, जॅकेट्स, ओव्हरसाइज्ड शर्ट्स आणि अशा अनेक

वर्गातील 1000 हून अधिक स्टाइल्समधून ग्राहक त्यांना हवे ते निवडू शकतात. या स्टोअरमध्ये एक्सक्लुजिव डिस्ने मार्व्हल कलेक्शन आहे. ट्रेण्डी स्टाइल्स अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट ब्रॅण्डपुढे आहे. ट्रेण्डी, परवडण्याजोग्या दरातील स्टायलिश उत्पादने केवळ 699 रुपयांपासून सुरु होणाऱ्या दरांमध्ये उपलब्ध आहेत. ब्रॅण्ड स्टुडिओ लाइफस्टाइलचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) श्याम प्रसाद म्हणाले. देशभरात 30 स्टोअर्स आधीपासूनच सक्रिय आहेत, त्यात 2025 सालापर्यंत 90 स्टोअर्सपर्यंत मजल मारण्याच्या त्यांच्या महत्त्वाकांक्षी योजनेत पुण्यातील स्टोअर हा महत्त्वाचा टप्पा आहे. या धोरणात्मक विस्ताराचे लक्ष्य प्रत्यक्ष व्यवसाय वाढवणे आणि फॅशन अधिकाधिक ग्राहकांच्या आवाक्यात आणून देणे हेच आहे.

## भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन 'किसान' सुरु

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'किसान' या भारतातील सर्वात मोठ्या कृषि प्रदर्शनाचे उदघाटन प्रदर्शनाला येणाऱ्या शेतकऱ्यांच्या पहिल्या गटाच्या हस्ते करण्यात आले. दिनांक 11 ते 15 डिसेंबर 2024 दरम्यान पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व संमेलन केंद्र, मोशी, पुणे येथे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

15 एकर पसरलेल्या प्रदर्शनात 500 हून अधिक कंपन्या, संशोधन संस्था व नवउद्योजक शेतीतील नवीन तंत्रज्ञान व उत्पादने सादर करतील. प्रदर्शनाच्या 5 दिवसांमध्ये देशभरातून एक लाखाहून अधिक शेतकरी भेट देतील असा अंदाज आहे. आधुनिक तंत्रज्ञान व नवे विचार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हे किसान प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. किसान प्रदर्शनाला शेती क्षेत्रातील मान्यवर संस्थांचा सहभाग व सहकार्य लाभले आहे. यंदा किसान प्रदर्शनात संरक्षित शेती, पाणी नियोजन, कृषी निविष्ठा, यंत्रसामुग्री, पशुधन, जैव, ऊर्जा, वाटिका व शेती लघु उद्योग अशी विभागवार दालने उभी करण्यात आलेली आहेत.

# 2024 'ग्लोबल एंटरटेनर ऑफ द ईयर' पुरस्काराने कपिल शर्मा यांचा गौरव

## नेटफ्लिक्सच्या 'द ग्रेट इंडियन कपिल शो' होस्टचा दिल्लीत झाला सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हास्याच्या दुनियेत आपले अभूतपूर्व योगदान देत मनोरंजन विश्वात आपले नाणे खणखणीतपणे वाजविणाऱ्या 'कपिल शर्मा' यांनी यंदाचा 'ग्लोबल एंटरटेनर ऑफ द ईयर' हा अत्यंत प्रतिष्ठित सन्मान पटकावला आहे. दिल्ली येथे आज झालेल्या समारंभात विविध क्षेत्रातील दिग्गजांच्या उपस्थितीत कपिल शर्मा यांचा या पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

अमृतसरमधून सुरुवात करणाऱ्या कपिलने मनोरंजन विश्वात केलेला हा प्रवास अनेकांना प्रेरणा देणारा ठरला



आहे. आपल्या अनोख्या विनोद शैलीमुळे कपील शर्मा जगभरातील प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय बनला आहे. नेटफ्लिक्सवरील 'द ग्रेट इंडियन कपिल शो' हा त्याच्या करिअरमधील सर्वात महत्त्वाचा मैलाचा दगड ठरला आहे.

'ग्लोबल एंटरटेनर ऑफ द ईयर' म्हणून पुरस्कार मिळाल्यानंतर कपिल शर्मा म्हणाला, "जेव्हा तुमचे काम इतके स्वीकारले जाते, तेव्हा खूप समाधान मिळते. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून सर्व भारतीयांनी केलेल्या प्रेमाची पावती आहे. जगभर विखुरलेल्या चाहत्यांचे निखळ मनोरंजन माझ्या हातून घडल्यामुळेच माझ्यासाठी हे शक्य झाले आहे. केवळ स्वतःचे आणि कुटुंबाचे नाव मोठे करण्यासाठी नव्हे तर मी कामावर श्रद्धा ठेवून आपले योगदान देत आहे. त्यामुळे हा पुरस्कार भारताचे नाव गर्वाने उंचावणारा आहे. नेटफ्लिक्समुळे हा शो आज जागतिक मंचावर पोचला आहे. प्रेक्षकांनी भरभरून दिलेले प्रेम आणि पाठींब्यामुळे आम्ही प्रेक्षकांचे ऋणी आहोत.

कपील शर्मा पुढे म्हणाला, "प्रत्येकाच्या जीवनात संघर्ष असतो. करीअरच्या सुरुवातीच्या काळात मलाही अडचणी आल्या. पण परमेश्वराची कृपा आणि आशीर्वादाने माझा मार्ग सोपा आणि रोमांचक झाला. अनेक चढ-उतार आले. पण हेच जीवन आहे. तरीही ही केवळ एक सुरुवात आहे, असे मी मानतो. 20 वर्षांपूर्वी इथेच या हॉटेलमध्ये कुठेतरी पार्श्वगायक म्हणून परफॉर्म केला होता. आज 20 वर्षांनी, त्याच हॉटेलमध्ये माझा या पुरस्काराने सन्मान झाला. या बद्दल मी परमेश्वराचे खूप आभारी आहे."

> नेटफ्लिक्सच्या माध्यमातून 'द ग्रेट इंडियन कपिल शो' आज वैश्विक पातळीवरील 192 देशांमध्ये पोहोचला आहे. या शो ने फक्त भारतातीलच नव्हे तर जगभरातील मनोरंजनाच्या विश्वात आपला वेगळा प्रभाव टाकला आहे. हा शो आता दुसऱ्या सिझनमध्ये असून जगभरातील प्रेक्षकांमध्ये आकर्षण आणि ट्रेंडिंगचे केंद्र बनला आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.